**मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचिका क्र. 176/2012 संदर्भात मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि.19/05/2022 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

---

**जनहित याचिका क्र.176/2012 संदर्भात आढावा** घेणेसाठी श्री. राधाकृष्ण गमे, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली **दि.19/05/2022 रोजी दुपारी 3.30 वाजता बैठक** घेण्यात आली. सदर बैठकीस खालील अधिकारी यांनी उपस्थिती नोंदवली.

1. आयुक्त, महानगरपालिका नाशिक
2. श्री. कुंदनकुमार सोनवणे, उप आयुक्त(करमणूक शुल्क ) नाशिक
3. श्री. बी.जी. शिंदे, सहा. अधिक्षक अभियंता व प्रशासन (CADA) नाशिक
4. श्री. एस. डी. शिंदे, अधिक्षक अभियंता, जलसंपदा नाशिक
5. डॉ. वर्षा फडोळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
6. श्री. एस. आर. वंजारी, शहरअभियंता, महानगरपालिका नाशिक
7. श्री. नितीन गवळी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक
8. श्री. जयवंत बोरसे, कार्यकारी अभियंता, औद्योगिक विकास महामंडळ नाशिक
9. श्री. सुमंत मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी डेव्ह. का.लि.
10. श्री. यु. एफ. धर्माधिकारी, अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) महानगरपालिका, नाशिक
11. श्री. डी. एन. इंगवे, उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय नाशिक
12. श्रीमती मोहिनी राणे, सहाय्यक संचालक, विभागीय माहिती कार्यालय नाशिक
13. श्रीमती पी एम पाटील, शिक्षण उप संचालक, नाशिक
14. श्री. राजेश पंडीत, याचिकाकर्ते
15. श्री. निशिकांत पगारे, याचिकाकर्ते

| मुद्दा क्रमांक | चर्चा व दिलेल्या सूचना | कार्यवाहक विभाग/यंत्रणा/अधिकारी |
|---|---|---|
| १ | बैठकीच्या सुरुवातीस उपस्थिती बाबत आढावा घेण्यात आला -<br>* प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक यांचे वतीने सहा. प्रादेशिक अधिकारी उपस्थित राहिले त्यांनी पुर्व परवानगी न घेतल्याने त्यांना बैठकीस उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली नाही. त्यांचे गैरहजेरी बाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना अशापद्धारे कळविण्यात यावे.<br>* जिल्हाधिकारी नाशिक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नाशिक देखील बैठकीसाठी उपस्थित राहीले नाहीत. त्यांचा खुलासा मागविण्यात यावा.<br>यापुर्वीचे बैठकीत संबंधीत अधिकारी यांना बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्यास पुर्व परवानगी शिवाय प्रतिनिधी यांनी उपस्थित राहु नये अशा सुचना देण्यात आल्या होत्या. या कार्यालयाने कामकाजा संदर्भात दिलेले निर्देशांची अंमलबजावणी करणे सर्व उपसमिती यांचेवर बंधनकारक आहे. सदर बाबत मा. उच्च न्यायालयाचे तसे स्पष्ट आदेश आहेत. उपसमिती सदस्यांना / यंत्रणा / विभाग यांना या कार्यालयाचे निर्देश / सोपविलेली कामे करावीच लागतील. मात्र ज्यां यंत्रणेला ते मान्य नसेल तर त्यांनी मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे, असेही स्पष्ट करण्यात आले. | RO MPCB / जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. |

| | | |
|---|---|---|
| २ | गोदावरी नदी प्रदुषण कामकाजाचे संदर्भात गुगलशिट तयार करुन google drive वर आपलोड करुन सर्व विभागांना (यंत्रणा/ उपसमिती) यांनी तीनमाही कामकाजा बाबतची माहिती भरण्या बाबत सुचना देण्यात आल्या. सदर गुगलशिट सर्व यंत्रणा / विभाग यांनी त्यांचे कामांची नोंद अद्यावत करत जावी. सदरच्या गुगलशीट नुसार पुढील सभेत आढावा घेण्यात येईल. | मनपा नाशिक<br>सर्व उपसमिती |
| ३ | * मा. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे पदनिर्देशीत अधिकारी बैठकीस गैरहजर राहीले.<br>गोदावरी प्रदुषण नियंत्रणाचे दृष्टीने पोलीस विभागाने मा. उच्च न्यायालयाचे निर्देशा प्रमाणे या तीन महिन्यात १३ केसेस. वाहनांचा नदीपात्रात अनाधिकृत प्रवेश, वाहने धुणे. कपडे धुणे. बेशीस्त पार्कींग करणे बाबत करण्यात आले.<br>* यासाठी ०१ पोलीस निरिक्षक, ४ सहाय्यक पोलीस निरिक्षक व २९ पोलीस कर्मचारी यांचा पोलीस बंदोबस्त देण्यात आला आहे काय? सदर पोलीस बंदोबस्त किती वेळ असतो संबधीतांना नेमुण दिलेल्या ठिकाणी ते कार्यरत आहेत, याबाबत किती अधिकारी व कर्मचारी व कोणत्या ठिकाणी नेमणुक करण्यात आली तसेच त्यांनी दैनंदिन केलेल्या कामाचा तपशिल दयावा.<br>* मा. उच्च न्यायालयाचे निर्देशा प्रमाणे आवश्यक तो पोलीस बंदोबस्त पुरविणे आवश्यक आहे. मा. उच्च न्यायालयाचे निर्देशाचे पालन करण्यास काही अडचण असल्यास किंवा ते मान्य नसल्यास मा. उच्च न्यायालयास सिव्हील ॲप्लीकेश दाखल करावे. नाहीतर मा. उच्च् न्यायालयाचे जे निर्देश आहेत त्याची अंमलबजावणी करावी. | पोलीस आयुक्त |
| ४ | * गोदावरी संवर्धना बाबत वेबसाईट तयार करणे, सदर वेबसाईटवर मा. उच्च न्यायालयाचे आदेश, उपसमितीच्या नेमणूक आदेश, उपसमिती यांना सोपविलेल्या जबाबदाऱ्या, त्यांचे कर्तव्य, यापूर्वी उपसमितींच्या बैठकींचे इतिवृत्त, NEERI यांनी सादर केलेला अहवाल तसेच शिफारशी, मा. उच्च न्यायालयात सादर करण्यात आलेले अहवाल, मा.न्यायालयाचे जे आदेश झालेले आहेत ते मराठीत अनुवादीत करुन वेबसाईवर प्रसिध्द करण्यात यावेत.<br>*गोदावरी प्रदुषणा बाबत तक्रारीचे ऑनलाईन पोर्टल तयार करावे. तक्रारींचे वर्गीकरण करणे.<br>*तक्रारीमध्ये संबंधीत तक्रारदारास फोटो किंवा व्हिडीओ अपलोड करण्याची सुविधा ठेवण्यात यावी.<br>* तक्रारीनंतर केलेल्या कार्यवाही संदर्भात पूर्वीचे फोटो व तक्रारीनंतर केलेल्या कार्यवाही नंतरचे फोटो अपलोड करण्यात यावेत.<br>* आढावा बैठकी नंतर त्या त्या विभागाने केलेल्या कार्यवाही बाबत छायाचित्रासह अहवाल वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावा.<br>* महापालिकेने तक्रार निवारण कक्षासाठी उपआयुक्त दर्जाचे अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांनी तक्रार निवारण कक्षात येणाऱ्या तक्रारी, तक्रारीचे निरसण याबाबत सर्व माहिती वेबसाईटवर वेळोवेळी अपलोड करावी. | महानगर पालिका /<br>उप संचालक शिक्षण |
| ५ | **गंगापुर व पिंपळगाव खांब येथे S.T.P. प्लॅन्ट बाबत.**<br>* महानगरपालिकेच्या जेवढे STP आहेत त्यांची दैनंदिन BOD व COD चा तपशिल वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावा.<br>* मोठया प्रमाणात नदी पात्रात दुषित पाणी सोडले जात असले बाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. याबाबत महापालिकेचे प्रतिनिधी यांनी मध्यंतरी काही STP नादूरुस्त होते असा खुलासा करण्यात आला. अशा वेळेस संबंधीत विभागाकडे आवर्तणाची | मनपा नाशिक, MPCB,<br>अधिक्षक अभियंता<br>जलसंपदा नाशिक |

31/5/21

| | | |
|---|---|---|
| | मागणी केली असतीतर दुषित पाणी नदी पात्रात साठून राहिले नसते. तरी सदर बाबत संबंधीत विभागाशी संपर्कात राहून तशी दक्षता घेण्यात यावी.<br>* STP तून निघणारे पाणी पुन्हा शेती, उद्याने व औद्योगीक क्षेत्रासाठी वापरता येईल का? या संदर्भात आभ्यास करण्यात येवून ०३ महिन्यात अहवाल सादर करण्यात यावा. शहरातील सर्व STP तुन निघणा-या BOD, COD बाबतची दैनंदिन माहिती संकेतस्थळ, वेबसाईटवर नियमित टाकावी. | |
| ६. | **गोदासंवर्धन –**<br>* नाशिक महानगरपालिका यानी गोदा संवर्धन कक्षाची स्थापना करुन गोदावरी नदीपात्रातील प्रदुषण टाळण्याच्या दृष्टीने दर्शनी भागावर / महत्वाच्या ठिकाणी टाकाऊ वसतु, कचरा, निर्माल्य कोठेही न टाकण्या संदर्भात विशिष्ट आकाराचे फलक लावून नागरीकांना आव्हान करणे.<br>* प्रदुषणा बाबत तक्रार दाखल झाल्यानंतर त्या तक्रारींना क्रमांक देण्यात यावा व त्याचा फोटो टाकण्यात यावेत.<br>* रामकुंड निर्माल्य किती वाहून नेण्यात आले गोदावरीवरुन किती कचरा उचलला वाहने धुणे, कपडे धुणे यासंदर्भात पोलिसांनी काय कार्यवाही केली याचा तपशील देवून सदरची माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी.<br>* वाहने गोदा घाटावर , नदीपात्रात जाऊ नये यासंदर्भात कायमस्वरुपी उपाय योजना म्हणून बॅरिकेटस लावण्या बाबत महनगरपालिकेने कार्यवाही करणे बाबत मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत त्यासाठी महापालिकेने कार्यवाही करावी.<br>* गोदा घाटावर जे काही निर्माल्य जमा होते ते निर्माल्य टाकण्यासाठी उपाययोजना करण्यात यावेत. निर्माल्य कलश जे भरुन वाहून जातात ते टाकण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी. गोदावरी नदीवरुन किती कचरा (निर्माल्य) उचलण्यात आला, किती पाणवेली काढण्यात आली त्या बाबतची माहिती वेबसाईटवर नियमित दर सोमवारी प्रसिध्द करण्यात यावी.<br>* गोदावरी नदीवर वाहने धुणाऱ्या व्यक्तींसाठी रु.५०० ते १००० रुपये दंड आकारण्यात येतो. त्याबाबत पथक नेमण्यात यावेत दंडाची रक्कम किती प्रमाणात वसूल करण्यात आली त्याबाबतचा तपशिल वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावा.<br>* शाळा कॉलेज मधील विद्यार्थ्यांना गोदावरी नदीप्रदुषण बाबत माहिती देण्यात यावी, जनजागृती करण्यात यावी. माहिती अधिकारी कार्यालयाने याविषयी पुरेशी प्रसिध्दी दयावी.<br>* पोलिसांनी वाहने धुणारे, कपडे धुणारे, नदीपात्र दुषित होईल अशी कृती करणाऱ्या किती लोकांना दंड आकारला यासंदर्भातील डाटा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. तसेच संबंधीतां विरुध्द सीआरपीसी १३३ अन्वये कार्यवाही करणे संदर्भात ही सूचना देण्यात आल्या.<br>* प्रत्येक आठवडयात दर सोमवारी गोदावरी प्रदुषणा संदर्भात संबंधित विभागाने जी काही कार्यवाही केलेली असेल ती माहिती पब्लिसिटी डिपार्टमेंटला देण्यात यावी. ती माहिती संबंधीत विभागाकडून प्रसिध्द करण्यात यावी.<br>* गोदा घाटावर बऱ्याच पुजाविधी केल्या जातात बऱ्याच वेळेस पुजेचे अर्धवट साहित्य निर्माल्य तत्सम वस्तू साहित्य नदिपात्रातच टाकले जाते याबाबत पुरोहीत संघाशी महानगर पालिकेने चर्चा करुन सदर कृती बाबत त्यांना सक्त सूचना देवून त्यास प्रतिबंध करण्यात यावा.<br>* नदीपात्राचे लगत सुलभ शौचालय- नदीपात्रालगत ई-टॉयलेट बसविण्याच्या | मनपा नाशिक/<br>पोलीस आयुक्त नाशिक |

| | | |
|---|---|---|
| | दृष्टीने महानगर पालिकेने कार्यवाही करावी.<br>* रामकुंडावर असणाऱ्या वस्त्रांतर गृहाच्या इमारतीत गोदावरी संवर्धन कक्ष स्थापन करण्याच्या दृष्टीने मनपाने कार्यवाही करावी व तसा फलक लावावा.<br>* पाणवेली नष्ट करण्याच्या दृष्टीने रासायनिक फवारणी करुन त्या नष्ट करण्याचे दृष्टीने अभ्यास करण्यात येवून तसा अहवाल सादर करण्यात यावा.<br>* पाणवेली काढण्यासाठी ट्रॅश स्किमरचा किती वापर होतो, किती प्रमाणात पाणवेली काढली जाते याचा तपशील ठेवण्यात यावा व वेबसाईटवर दर आठवडयाला अपलोड करण्यात यावा.<br>* प्रदुषण संदर्भात प्राप्त तक्रारीचे अभिलेख जतन करणे, तक्रार निवारण कक्ष स्थापन करुन तक्रारीचे निराकरणे करणे, ज्या तक्रारी प्राप्त होतात त्या तक्रारींचे अभिलेख जतन करणे बाबत मा. उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत तशी कार्यवाही मनपाने करावी.<br>* गोदासंवर्धनाबाबत NEERI अहवाल वेबसाईटवर अपलोड करणे. | |
| ९. | **MPCB & MIDC**<br>महानगरपालिकेचे सर्व मलनिस्सारण केंद्र, एमआयडीसी व इतर ठिकाणाहून निर्माण होणाऱ्या दुषित पाण्याची नियमित तपासणी MPCB यांनी करणे, तपासणीचा दर्जा बाबत खात्री करुन दोषी व्यक्ती व संस्था यांचेविरुध्द दंडात्मक कारवाही करणे बाबत निर्देश आहेत.<br>MIDC यांनी खुलासा केला की, याबाबत ४५ कंपन्यांना नोटीस देण्यात आलेल्या होत्या २५-३० इंडस्ट्रिजचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला होता. त्यात सुधारणा झाल्यानंतर काही कंपन्यांचा पुरवठा सुरु करण्यात आला. नाल्यांमध्ये दषीत पाणी आढळल्यास संबधीत कंपनीवर कारवाई केली जाते. त्याबाबतचा अहवाल एमपीसीबीला सादर केलेला आहे.<br>* औद्योगिक क्षेत्रातील दुषीत पाणी, मनपाचे STP मधील दुषीत पाणी गोदावरी नदीपात्रात येते. CETP ला कनेक्टीव्हिटी नाही. टॅंकरने दुषीत पाणी जमा करुन CETP ला आणुन त्याची विल्हेवाट लावणे शक्य आहे काय ती किती खर्चीक आहे हया बाबी तपासाव्यात. याबाबत शासन पुरस्कृत महाप्रित कंपनी मार्फत संशोधन करुन निरसन करता येईल याचा अहवाल पुढील सभेत ठेवावा.<br>* मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी पाणी (प्रतिबंध आणि प्रदुषण नियंत्रण) अधिनियम १९७४ चे कलम २५ व ४७ कलमान्वये कार्यवाही करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. एमसीबी वर सदरची जबाबदारी देण्यात आलेली आहे. दुषित पाण्याचा डिसचार्ज होवू न देणे त्याबाबत पाणी (प्रतिबंध आणि प्रदुषण नियंत्रण) अधिनियम १९७४ चे कलम ४७ मध्ये संबंधीता विरुध्द कार्यवाही करणेबाबत नमुद केलेले आहे. MPCB ने आजपावेतो काय कारवाई केली आहे याबाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. MPCB ने दाखल केलेल्या गुन्हया संदर्भात अहवाल सादर करणे अपेक्षीत आहे असा अहवाल सादर केला नसल्यास मा.उच्च न्यायालयास अहवाल सादर करावा. | MPCB /<br>MIDC<br>मनपा नाशिक |
| १०. | **प्रसिध्दी** – गोदावरी प्रदुषणा बाबत जनजागृती होण्याच्या दृष्टीने मनपा शाळेत मनपाचे शिक्षण अधिकारी यांच्या मदतीने आवश्यक ती उपाययोजना करुन जनजागृती करण्यात यावी. सदर कामास पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी. | मनपा नाशिक |
| ११. | **गंगापुर धरणातुन गोदावरी नदी पात्रात सोडण्यात येणाऱ्या पर्यावरणपुरक प्रवाह निश्चित करणे**<br>गंगापुर धारणातुन पाणी सोडतांना नोव्हेंबर ते जानेवारी या महिन्यात ०१ | स्मार्ट सिटी डेव्ह. का.लि./<br>मनपा नाशिक |

| | | |
|---|---|---|
| | आठवड्यासाठी ४१ क्युसेक पाणी सोडण्यात यावे. फेब्रुवारी ते जून या कालावधीत १० दिवसासाठी १२५ क्युसेक पाणी सोडण्यात यावेत NEERI च्या अहवाला नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर बाबत मनपा यांनी संबंधीत विभागाशी संपर्क करुन नदीत पर्यावरण पुरक प्रवाह राहिल यादृष्टीने कार्यवाही करणे.<br>* नासर्डी नदीमध्ये ड्रेनेजचे पाणी सोडण्यात आले असून उन्हाळयामध्ये नदी वाहती आहे. याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.<br>* सद्यस्थितीत नदीचा प्रवाह विस्कळीत झालेला आहे. रामकुंडावरील बंधाऱ्याचे काम किती दिवसात पूर्ण करणे बाबत नियोजन आहे. दिड वर्षात करणे अपेक्षित होते. वर्कऑर्डर प्रमाणे काम सुरु आहे का? टेंडर प्रमाणे काम न झाल्याने ठेकेदारावर काय कारवाई करण्यात आली. पावसाळया आधी सदरचे काम करणे अपेक्षीत आहे. याबाबतची परिपुर्ण माहिती पुढील आढावा सभेत सादर करणे. | जलसंपदा विभाग<br><br>MPCB/ MIDC<br><br>स्मार्ट सिटी डेव्ह. का.लि./ मनपा नाशिक |
| १२. | **स्मार्ट सिटी**<br>स्मार्ट सिटी कडून संथ गतीने काम सुरु असल्याबाबत अहवाल मनपाने सादर केलेला होता त्याबाबत स्मार्ट सिटीकडून खुलासा घेण्यात आला त्यांचे अहवाला नुसार ज्याठिकाणी काम चालू आहे त्याठिकाणी अतिक्रमण असल्याने काम करतांना अडथळा निर्माण होतो. यावर मनपा व स्मार्ट सिटी यांना संयुक्त चर्चा करुन संबंधीत अभियंता यांना पावसाळया पर्यंत काम करण्याचे निर्देश देण्यात आले. अतिक्रमणा बाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी. संबंधीत बिल्डर व डेव्हलपर यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत.<br>* नदीच्या अजुबाजुला किती अतिक्रमण आहे याची पहाणी करुन ते काढण्या करीता नियोजनबध्द आराखडा तयार करण्यात यावा. | स्मार्ट सिटी डेव्ह. का.लि./ मनपा नाशिक |
| १३ | तक्रार अर्ज<br>१. गोदावरी नदीत बांधलेल्या सिमेंट कॉंग्रिटच्या भिंती बाबत श्री.पगारे यांनी तक्रार दाखल केली आहे. याबाबत NEERI ने दिलेल्या सुचना नुसार कामकाज झाले काय याची तपासणी करुन पुढील सभेत अहवाल सादर करावा.<br>२. गोदावरी नदीत सोडत असलेल्या सांडपाण्याबाबत श्री.पगारे यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर मनपा व स्मार्ट सिटी यांनी तातडीने सदर बाबत कार्यवाही करावी.<br>३. गोदावरी प्रदुषण रोखण्याच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्ताचे अनुषंगाने श्री. पंडीत यांनी केलेल्या तक्रारी बाबत मा. उच्च न्यायालयाचे आदेशातील परिच्छेद नं.२९ पा.नं.३३ यावरील निर्देश पोलीस आयुक्त यांचे निदर्शनास आणून त्यांनी उचित कार्यवाही करावी.<br>४. श्री प्रमोद फाल्गुने यांनी दि.२४.३.२०२२ बाबत गोदावरी नदीत सांडपाणी सोडले जात असल्या बाबत तक्रार केली होती. याबाबत मनपा ने वनविभागाचे नर्सरी व सुयोजित पुल जवळीत ड्रेनेज लिक असल्याने सदर दुरुस्ती करण्यात येऊन सांडपाणी रोखण्यात आले आहे. याबाबतचा केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मनपाने पुढील सभेत सादर करावा.<br>५.सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग यांनी दि. ०८.०३.२०२२ अन्वये निळकंठेश्वर मदादेव मंदीराच्या पाय-या तोडल्या बाबत तक्रार केली आहे. त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल स्मार्ट सिटीने पुढील सभेत सादर करावा.<br>* नदीकिनारी ब-याच ठिकाणी इतर जागेवरुन खोदकाम करुन मुरुम, माती तसेच बांधकाम तोडल्याचे बिल्डींग मटेरीयल डेब्रीज टाकले जाते त्याबाबत शोध घेऊन | स्मार्ट सिटी डेव्ह. का.लि./ मनपा नाशिक/ पोलीस आयुक्त |

| | | |
|---|---|---|
| | संबधीताविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी<br>* गणेशउत्सवास अजुन बराच कालावधी आहे त्याबाबतही शाडुच्या मातीचे गणपती तयार करण्या बाबत योग्य ते नियोजन करण्यात यावे. POP चे मुर्तीस प्रतिबंध करण्या बाबत नियमानुसार निर्णय घ्यावा. | |
| १४. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ नाशिक यांनी सातपुर व अबड या औद्योगिक वसाहतीत / क्षेत्रात CETP उभारणे कार्यान्वीत करणे बाबत NEERI चे अभिप्राय विचारात घेऊन कार्यवाही करावी. | MPCB/ MIDC/ मनपा नाशिक |
| १५. | * वालदेवी नदीच्या प्रदुषणा बाबत ब-याच तक्रारी होतात. त्याबाबत मनपा ने पहाणी करुन योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाही बाबत पुढील सभेत अहवाल सादर करावा.<br>* रेन वॉटर हार्वेस्टींग बाबत मनपा ने अंमलबजावणी करावी. तसेच नाशिकचा पाणीस्तर बाबत भुजल सवेक्षण विभागाने सर्वे करुन पुढील सभेत अहवाल सादर करावा. | मनपा नाशिक/ भुजल सर्वेक्षण विभाग |
| १५. | सर्व उपसमिती, यंत्रणा, विभाग (NMC, MPCB, MIDC, NERRI, POLICE) यांनी मा उच्च न्यायालयाचे आदेशातील निर्देश पाळणे हे त्यांचेवर बंधनकारक असल्याने त्या त्या सुचनांची अंमलबजावणी करावी. | सर्व उपसमिती व उपसमिती सदस्य |

वरील प्रमाणे चर्चा होऊन सभेचे कामकाज संपविणेत आले.

27.05.22.

(राधाकृष्ण गमे)
विभागीय आयुक्त, नाशिक

स्थळ- नाशिकरोड दि. 27 .05.2022
क्र. कक्ष-15/क.शु./जहिया 176/2012



31/5/22
31/05/2022